REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 9 | JUNE - 2018

# कलचुरी नृपती यांच्या काळात धार्मिक परिस्थिती एक दृष्टीक्षेप



**अमोल भगवानराव आकात**
**मु.पो. सेलु ता. सेलु, जि. परभणी**

## सारांश

कलचुरी नृपती यांच्या काळात धार्मिक जीवण प्रणाली कोणत्या पध्दतीची होती. याचा धावता आढावा या संशोधन लेखात केलेला आहे. कलचुरी यांच्या काळात बौध्द, शैव धर्माचा चांगल्या पध्दतीने प्रसार झालेला दिसुन येतो.

## प्रस्तावना

आद्य कलचुरींच्या कालात भारतात बौध्द धर्माचा सर्वत्र प्रसार होता. कृष्णराज हा खिस्तोत्तर सहाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास उदयास आला. त्या पुर्वीच्या वाकाटकांच्या काळात बौध्दधर्म भरभराटीत होता. हे त्या काळच्या अंजठ्याच्या लोण्यावरुन दिसुन येते. अजंठ्याची सोळा, सतरा व एकोणीस क्रमांकाची लेणी वाकटकांचे मंत्री व मांडलिक यांनी कोरलेली होती. त्यावरुनत्या काळी बौध्द धर्माचे चांगलेच वर्चस्व होते. हे दिसुन येते. आद्य कलचुरींच्या पतनानंतर बदामीच्या चालुक्यांच्या राजवटीत खिस्तोत्तर सातव्या शतकाच्या पुर्वार्धात सुप्रसिध्द चिनी यात्रेकरु ह्युएनत्संग भारतात आला होता. त्याने महाराष्ट्रात, गुजराथ व दक्षिण कोसल येथील बौध्द व हिंदु धर्माच्या परिस्थितींचे वर्णन लिहुन ठेवले आहे. त्यातील उल्लेखावरुन असे दिसते की, महाराष्ट्रात शंभरहुन अधिक बौध्द मठ होते. आणि त्यात हीनयान व महायान या दोन्ही पंथाचे मिळुन पाच हजारांवर भिक्षु राहत असत. गुजराथेतील भरुकच्छ देशात दहापेक्षा अधिक बौध्द मठ होते. व त्यात ३०० महायान पंथाचे भिक्षु राहत होते. दक्षिण कोसलांत शंभराहुन अधिक मठ असुन त्यातींल सर्व भिक्षु महायान पंथाचे होते. त्यांची संख्या सुमारे दहा हजार होती. या वर्णनावरुन आद्य कलचुरींच्या काळची बौध्दधर्माच्या प्रसाराची कल्पना येइल. (१) तथापी त्यानंतर हळु हळु त्या धर्माला उतरती कळा लागु लागली. यांचे मुख्य कारण त्याचा राजाश्रय जाऊं लागला हे होय. खिस्तोत्तर तिसऱ्या चौथ्या शतकापासुन वैदिकधर्मी राजांचा काळ सुरु झाला. हे राजे परधर्मसहिष्णु असल्यामुळे ते क्वचित बौध्द मठांनाही देणग्या देत उदाहणार्थ ह्युएनत्संगाच्या काळी दक्षिण कोलसांत राज्य करणारा सोमवंशी राजा महाशिवगुप्त बालार्जुन हा स्वतः शिवोपादक होता. तरी त्याने आपली राजधानी श्रीपुर येथील इतर ठिकाणच्याही बौधअध विहारांना उदार देणग्या दिल्या होत्या. देशांतील सधन बैश्य वर्गाचाही त्या धर्माला आश्रय होता. त्यामुळे त्याची काही काळ चलती राहीली. तथापी खिस्तोत्तर तृतीय शतकानंतर बौध्द मठांना राजाश्रय मिळाल्याची उदाहरणे एकदंरीत कमीच आहेत. याचा उलट तत्कालीन कोरीव लेखांत अश्वमेधादि श्रोत यागांचे उल्लेख अनेक आढळतात. विष्णु, शिव, कार्तिकेय इत्यादी पौरानीक देवांची देवालये बांधण्याचा प्रघातही सर्व भारतभर सुरु झाला होता. व हळुहळु सामान्य बौध्द धर्माची पिछेहाट हळुहळु कशी कमी झाली ते दिसुन येइल.**शैव सांप्रादय** ( २ ) बहुधा सर्व आद्य व उत्तरकालीन कलचुरी नृपती शिवोपासक होते. या नियमाला अपवाद असा एकच – त्रिपुरीच्या तृतीय शंकरगणाचा हा राजा विष्णुपासक होता. व त्याने भगवान विष्णुचे शंकरनारायण या नावाने मुरवाड्याहुन २७ मैलावर वडगांव येथे देवालय बांधले होते. इतर सर्व कलचुरी नृपति श्री. शंकराचे उपासक असल्याने त्यांच्या

राजवटींत शैवपंथांचा अत्यंत उत्कर्ष झाला हे सांगणे नकोच.( ३ ) प्राचीण काळी शैव संप्रादायाच्या अनेक शाखा भारतात उत्पन्न झाल्या त्यापैकी शैव, पाशुपत, कारुका सिध्दांती व कपालिक यांचा उल्लेख रामानुजादी आचार्यांनी व शंकरभाष्याच्या टीकाकारांनी केला आहे. यापैकी कारुक सिध्दांतीविषयी आपणास फारशी माहिती नाही. काहींच्या मते त्यास कालमुख किंवा कालानन असेंहि म्हणत. कालमुखांचा निर्देश काही कोरीव लेखांतही होतो, कापालिक संस्कृत वाङमयात व क्वचित कोरीव लेखांतही दृष्टीस पडतात. भवभुतीच्या मालतीमाधवा तील अधोर घंट व कपालकुंडला कापालिक पंथाचे होते. खिस्तोत्तर सातव्या शतकांत होऊन गेलेल्या महेंद्र विक्रमवर्मा पल्लवनृपतीने मत्तविलास प्रहसन या संस्कृत प्रहसनांत कापालिकांच्या आचारांचे विडम्बन केले आहे. पण या दोन मतांपेक्षा पाशुपत व शैव मतांचा प्रसार अधिक होता. पाशुपत मतांचा संस्थापक नकुलीश किंवा लकुलीश हा खिस्तोत्तर दुसऱ्या शतकाच्या आरंभी गुजराथेतील कायावतार किंवा कायावरोहन येथे होऊन या पाशुपतमताचा प्रसार पश्चिम भारतात मथुरा, राजपुताना, गुजराथ, कर्नाटक इत्यादी प्रदेशात झाला होता. लकुलिशाचा शिष्य कुशिक याच्या नंतर गुरुशिष्य परंपरेतील दहावा आचार्य उदिताचार्य याचा स्तंभलेख मथुरा येथे सापडला आहे. तो सुप्रसिध्द गुप्त सम्राट व्दितीय चंद्रगुप्त याच्या काळात गुप्त संवत ६१ या वर्षाचा आहे. त्यानंतरचे काही लेख राजपुतान्यात सापडले आहेत. उदयपुरचे रजपुत राजे ज्या अकलिंगजीचे उपासक होते त्याच्या मंदिराच्या परिसरात लकुलीशाची भव्य मुर्ती आहे. गुजराथेतील तर या पंथाचा उद्गम झाल्याने त्याचा प्रसार विशेषच झाला होता. पुढे कर्नाटकातही हा पंथ पसरला. या पंथाच्या आचार्यांच्या नावांच्या शेवटी राशी हे पद आढळते. चौथे शैव मत सिध्दांतमत या नावानेही प्रसिध्द होत. या मताच्या आचार्यांना सैध्दांतीक म्हणत. त्यांच्या नावांच्या शेवटी शिव किंवना शंभु असे पद बहुदा असे. हो मत भगवान शंकरांनी स्वतः ब्रम्हदेवास दारुवनांत प्रथम उपदेशिले व पुढे त्याचा सर्वत्र प्रसार झाला असे प्राचीन कोरीव लेखांत म्हटले आहे. या शैवमताचा प्रचार भारतातील अनेक प्रदेशात झाला होता.व देशपरत्वे त्याच्या शाकांत भिन्न नावेंहि प्राप्त झाली होती.( ४ ) या आद्य कलचुरी नृपतींनी आपले इष्ट दैवत शिव यांची अनेक देवालये आपली राजधानी माहिष्मती नगरी येथे व राज्यातील इतर ठिकाणी उभारली असावी पण आता त्यातील एकही अवेशरुपाने सुध्दा विद्यमान नाही. तथापी मुंबईजवळची घारापुरची एलफंटा लेणी ही कलचुरीच्या काली कोरविली. असावी असे मानण्यास प्रमाण आहे. ह्या लेण्यांच्या काळाविषयी भिन्न भिन्न् मते व्यक्त झाली आहेत. बर्जेसच्या मते ती खिस्तोत्तर ८०० च्या सुमारची असावी हीरानंद शास्त्रांच्या मते ती गुप्त कालखंडात – अर्थात पाचव्या – सहाव्या शतकांत कोरली गेली असावी याच्या उलट श्री. य.रा गुप्ते म्हणतात की, मुख्य लेणे व त्यातील मुर्ती इ.स. च्या सातव्या शतकाच्या पुर्वार्धात खोदलेली असावी. ( ५ ) त्रैकुटकांचा पराजय केल्यावर त्यांच्या राज्याचा काही भाग कृष्णराजाने आपल्या मांडलिकात वाटुन दिला हेता असे दिसते. त्यापैकी अपरान्त किंवा कोकण हा प्रदेश त्यांने मौर्यास दिला होता. या प्रदेशावर मौर्याचे राज्य व्दीतीय पुलकेशीने त्यांचा पराभव करुन तो आपल्या राज्यास जोडीपर्यंत टिकले होते. तथापी मौर्यांचे हातुन घारापुरीसारखी लेणी कोरली गेली असतील हे संभवनीय वाटत नाही. या कामास लागणारे उत्कृष्ट कारागीर व अवाढव्य पैसा जमविणे कलचुरीसारख्या साम्राज्यसत्तेसच शक्य झाले असते. ( ६ ) विष्णुंची अनेक देवालये त्रिपुरी व रत्नपुरच्या कलचुरींच्या राज्यात बांधली होती. असे कोरीव लेखांतील उल्लेखावरुन दिसते. बांधवगड व त्यानजीकचे गोपालपुर येथे प्रथम युवराज देवाचा अणआथअ गोल्लाक उर्फ गौड याने विष्णु च्या मत्स्य, कुर्म, वराह,परशुराम व हलधर यांच्या भव्य प्रस्तरमुर्ती कोरविल्या होत्या त्याशिवाय भगवान शेषशायीची मुर्तीहि त्याने कोरविली होत. विष्णुच्या अवतारांच्या मुर्ती कोरवितांना कृष्णाबद्दल बलरामची मुर्ती घालत असत असे प्राचीन काळच्या शिल्पपट्यावरुन व प्रभावळीवरुन दिसते व तोच प्रघात गोल्लाकाने अनुसरला होता. यानंतर व्दितीय लक्ष्मणराजाचा मंत्री सोमेश्वर यानेहि कारतलाई येथे भगवान विष्णुचे उत्तुंग देवालय बांधविले होते व त्यात

सोमस्वामी नामक वराहावताराची मुर्ती स्थापित केली होती. या देवालयांचे सुंदर वर्णन कारीतलाई येथील शिलालेखात आले आहे.

या प्रमाणे भगवान विष्णुचीं काही देवालये चेदि देशात बांधली गेली असली तरी त्यापेक्षा श्रीशंकराची देवालये किती तरी अधिक व जास्त उत्तुंग होती. कारण कलचुरी राजे स्वतः शिवोपासक असल्यामुळे त्यांच्या त्या पंथास उदार आश्रय होता. त्रिपुरीच्या शाखेचा मुळ पुरुष वामनराजदेव हा परममाहेश्वर म्हणजे भगवान शंकराचा एकनिष्ठ उपासक होता. त्याने प्रथम ज्या कालंजर दुर्गात आपली राजधानी केली तो दुर्गही अत्यंत प्राचीन काळापासुन पवित्र शिवालयाबद्दल प्रसिध्द आहे. पुढे कलचुरी वंशाच्या दोन शाखा होउन एक सरयुपार देशांत व दुसरी त्रिपुरी येथे स्थापन झाली. सरयुपारचे कलचुरी शैव होते हे त्यांच्या ताम्रपटाच्या मुद्रेवरिल नंदिच्या आकृतीवरुन स्पष्ट दिसते. भारतीय राज्यांत उज्वल परंपरेस अनुसरुन त्यांनी आपल्या राज्यातील कुशनगर येथील भगवान बुध्दाच्या परिवर्तणचैत्यालाही दान दिले होते. ( ८ ) त्रिपुरीचे कलचुरीहि शैव होते. हे मागे सांगितले आहेच. त्यांनी आपल्या ताम्रपटांच्या मुद्रेकरिता गजलक्ष्मीची आकृती पसंत गेली असली तरी आपल्या शिवोपासनेचा निदर्शक नंदीही तिजवर घेतला होता. या नंदिच्या आकृतीवरुन काहींनी मुद्रेवरची देवी पार्वती असावी असे वाटले. पण ती लक्ष्मी आे कारण तिच्या दोन्ही बाजुस सोंड वर केलेले हत्ती आहेत. ( ९ ) त्रिपुरीच्या कलचुरींच्या राज्यात शैव संप्रादायाचा मोठा उत्कर्ष झाला या शाखेचा महाप्रतापी राजा प्रथण युवराजदेव याची कारकीर्द त्याने मत्तमयुर मटाच्या आचार्यास दिलेल्या राजाश्रयामुळे चिरस्सरणीय झाली आहे.

## संदर्भ सुचीः


१. शास्त्री हिरानंद – ए गाईड टु एलिफंटा पृष्ट क्र. ७४
२. कित्ता- पृष्ट क्र. ७६
३. गुप्ते अ. रा. – घारापुरीची लेणी पृष्ट क्र. ४
४. ग्वाल्हेर पुरातत्व खात्याचा १९३०-३१ चा वार्षिक अहवाल पृष्ट क्र. १०
५. कित्ता - पृष्ट क्र. ११
६. विलासपुर जिल्हा गॅजेट - पृष्ट क्र. २७१
७. शास्त्री हिरानंद – ए गाईड टु एलिफंटा पृष्ट क्र. ४७
८. कित्ता - पृष्ट क्र. ५२
९. राखलदास बॅनर्जी - पृष्ट क्र. ४२